# 'रेटिना'च्या सहाशेवर रुग्णांची मोफत तपासणी

## रेटिना इंडिया व एम्को फाउंडेशनतर्फे शिबिर

सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. १५ : रेटिना इंडिया व एम्को फाउंडेशनतर्फे आज खान्देश सेंट्रल मॉलमध्ये डोळ्यांच्या पडद्याची मोफत तपासणी (रेटिना) शिबिर झाले. शिबिरात सुमारे सहाशे रुग्णांची तपासणी करण्यात आली.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. एस. एन. लाळीकर, डॉ. रजत अग्रवाल, डॉ. शिवराज मुळीक, रमेश जैन, रत्ना जैन, महापौर राखी सोनवणे, सुनील महाजन, नितीन लढ्ढा, मीनाक्षी जैन, अशोक जैन, डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांच्या प्रमुख उपस्थित शिबिराचे उद्घाटन झाले. शिबिरात 'ऑप्टोनिक आय'चे (अमेरिका) संशोधक डॉ. अग्रवाल यांनी आलेल्या रुग्णांची डोळ्यांची व डोळ्यांच्या पडद्याची तपासणी केली. शिबिरात तपासणीदरम्यान दृष्टिदोष असणाऱ्या गरजू रुग्णांची विनामूल्य शस्त्रक्रिया नेत्रतज्ज्ञांमार्फत मुंबई येथे केली जाणार आहे. रामेश्वर नाईक, अरविंद देशमुख, अमित देशमुख, पितांबर भावसार यांनी सहकार्य केले.




जळगाव : शिबिराचे उद्घाटन करताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. एस. एन. लाळीकर. शेजारी डॉ. रजत अग्रवाल, डॉ. शिवराज मुळीक, रमेश जैन, रत्ना जैन, महापौर राखी सोनवणे आदी.